**दिनांक: १८ /९/ २३**

**विषय: संस्थेचे सभासद / कुटुंबीय यांच्या आपले पुनर्निर्माण सल्लागार आणि विकासक यांच्या बरोबर झालेल्या स्वतंत्र बैठका.**

पत्रकार नगर पुनर्निर्माण प्रकल्पात सध्या असलेली FSI वाटपा च्या मुद्द्या वर झालेली कोंडी सोडवण्याच्या दृष्टी ने दिनांक १६/९/२३ ला संस्थे चे पुनर्निर्माण सल्लागार, विधी सल्लागार तसेच निवडलेल्या बिल्डर चे प्रतिनिधी यांच्या सोबत संस्थे च्या सभासद् आणि कुटुंबीय यांच्या स्वतंत्र अश्या बैठका आपल्या समाज मंदिरात घेण्यात आल्या.
सल्लागार आणि बिल्डर यांना प्रत्येक सभासद समुहा चे वाढीव FSI वाटपा बाबत काय म्हणणे आहे ते समझऊन घ्यायचे होते.
ह्या साठी सभासदांचे तीन गट केले होते. पहिला गट १२ डूप्लेक्स सभासदांचा होता, दुसरा गट सिंधू, कृष्णा, गोदावरी, मेघना आणि प्रवरा इमारतीतल्या सभासदांचा होता तर तिसरा ग्रुप मानसी, शरावती, शरयू, झेलम आणि इंद्राइणी इमारतीतल्या रहिवास्यांसाचा होता.

दुपारी ३ ते संध्याकाळी ६ पर्यंत चाललेल्या ह्या बैठकात सर्वांनी त्यांचे विचार, त्यांना वाटत असलेली भीती आणि अपेक्षा सल्लागार आणि विकसका पुढे मांडले.

सल्लागार आणि विकसक दोघां कडून सर्व सभासदांना ही बाब स्पष्ट पणे सांगण्यात आली की हा तिढा तडजोडी च्या मार्गानेच सुटू शकतो.  प्रत्येका ने इगो चा इशु न करता सर्वांना मान्य होईल असा सुवर्ण मध्य काढण्याचा प्रयत्न करायला हवा. हे ही सांगण्यात आले की पत्रकार नगर चे पुनर्निर्माण ही प्रत्येक सभासदा साठी सुवर्ण संधी आहे त्या करिता सर्व सभासदांनी एकत्रित येऊन ह्या संधी चे सोने करण्या साठी एक दिलाने प्रयत्न करावे.
तिन्ही बैठकांमधे मांडले गेलेले विचार आणि प्रश्न ह्या वर सल्लागार आणि विकसक त्याचा अभिप्राय पंच समिती आणि सभासद यांना लौकरच सादर करतील असे आश्वासन सल्लागारां तर्फे देण्यात आले.

ह्या बैठका पंच समिती ने आयोजित केल्या असल्या तरी पंच समिती चा ह्यात सहभाग फक्त ग्रूप चे सभासद ह्या पुरताच मर्यादित होता.

**प्रदीप नेवाळकर**